MCGM OFFICIAL GROUPS
MUBEEN KHAN -9029798198
& URDU TEACHERS UNION

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## 2019-20

## क्र. साप्रवि/एफजीआर/19  दिनांक 11.09.2019

विषय –उपदान अधिदान अधिनियम, 1972 अन्वये महानगरपालिका कर्मचा-यांच्या उपदानाच्या कमाल रकमेमध्ये ₹10 लाखांवरुन ₹20 लाखापर्यंत वाढ करणेबाबत.

संदर्भ – 1) परिपत्रक क्र.डीपीएआर/एफजीआर/24 दिनांक 19.11.1996.

2) परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/08 दिनांक 06.06.2012.

3) राज्य शासनाचा शासन निर्णय क्र.सेनिवे-2019/प्र.क्र.58/सेवा-4 दि.01 मार्च 2019.

4) केंद्र शासन अधिसूचना No.S-42012/02/2016-SS-II, Notification- New Delhi- 29 March 2018

5) स्थायी समिती ठराव क्र.583  दि.07.08.2019

6) महानगरपालिका ठराव क्र.775 दि.29.08.2019

केंद्र शासनाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार संदर्भ क्र.4 वरील दिनांक 29.03.2018 रोजीच्या अधिसूचनेन्वये उपदान अधिदान अधिनियम 1972 नुसार देय असलेली उपदानाची कमाल मर्यादा ₹10 लाखांवरुन ₹20 लाखांपर्यंत वाढविण्याचे निर्देश दिले आहेत.

उपदान अधिदान अधिनियम 1972 मध्ये केंद्र शासनाने केलेल्या उपरोक्त नमूद दुरुस्तीनुसार उपदानाची कमाल मर्यादा दि.29 मार्च 2018 पासून ₹20 लाख अशी वाढवून त्याचा लाभ महानगरपालिका कर्मचा-यांना लागु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास स्थायी समिती/ महानगरपालिकेने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधिन क्र.5 व 6 च्या ठरावाद्वारे मंजूरी दिली आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना प्रसारित करण्यात येत आहेत.

1. उपदान अधिदान अधिनियमानुसार 5 वर्षाच्या सलग सेवेनंतर सेवा समाप्त झालेल्या कर्मचा-यांना उपदान अनुज्ञेय असेल.

   अ) कर्मचा-याच्या नियत वयोमानानुसार सेवा समाप्ती

   ब) कर्मचा-याच्या निवृत्ति  किंवा राजीनाम्यानंतर

   क) कर्मचा-याचा मृत्यू किंवा अपघात अथवा आजारपणामुळे असमर्थता (Disablement)

2. उपदानाची रक्कम खालील सुत्रानुसार परिगणित करण्यात येईल.

   उपदान = <u>शेवटी घेतलेले वेतन X 15 X अर्हकारी सेवा</u>  ( सहा महिन्यापेक्षा जास्त असलेली सेवा एक वर्ष समजण्यात यावी.)

MCGM OFFICIAL GROUPS
MUBEEN KHAN -9029798198
& URDU TEACHERS UNION

3. उपदानाच्या परिगणनेसाठी आवश्यक असणा-या वेतनात खालील बाबींचा समावेश होतो.
मुळ वेतन, विशेष वेतन, वैयक्तीक वेतन, जोखीम वेतन वैयक्तीक भत्ता, एकत्रित वैयक्तीक भत्ता, एकत्रित वैयक्तीक वेतन, विशेष वेतन (कार्यभार भत्ता), महागाई भत्ता, RDA, महागाई वेतन (असल्यास) परंतू खाजगी व्यवसाय हानी भत्त्यासह इतर भत्त्यांचा समावेश नाही.
4. उपदानातील सदर वाढ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीत वेतन घेणा-या वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापक प्रवर्गासिहित महानगरपालिका वेतनश्रेणीतील सर्व विद्यमान कर्मचा-यांना लागू होईल.
5. दि.29 मार्च 2018 रोजी व त्यानंतर सेवा समाप्त झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना सदर वाढीचा फायदा मिळेल.
6. बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नुसार मृत्यू-नि सेवा-उपदान (DCRG) अनुज्ञेय असलेले उपदान किंवा उपदान अधिदान अधिनियम, 1972 नुसार उपदान यापैकी जे जास्त असेल ते उपदान महानगरपालिका कर्मचा-यांना देय होईल.
7. उपदानाची कमाल मर्यादा वगळता परिपत्रक क्र.डीपीएआर/एफजीआर/24 दिनांक 19.11.1996 मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती कायम राहतील.
8. महानगरपालिका माध्यमिक शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना उपदान अधिदान अधिनियम, 1972 लागू नसल्याने सदर उपदान अनुज्ञेय नाही. या कर्मचा-यांना राज्य शासनाच्या निवृत्तीवेतन नियमामधील तरतूदीनुसार सेवा उपदान /मृत्यू उपदान अनुज्ञेय होईल.
9. दि.29 मार्च 2018 रोजी व त्यानंतर सेवा समाप्त झालेल्या कर्मचा-यांना वरील सुचनांप्रमाणे उपदानाची रक्कम अनुज्ञेय होत असल्यास फरकाचे उपदानाचे दावे दि.01.01.2016 च्या सुधारित वेतनश्रेणीनुसार सुधारित आधारसामग्री प्रपत्रासह निवृत्तीवेतन उपविभागाकडे लेखा परिक्षण व अधिदानासाठी दि.25 ऑक्टोबर 2019 पर्यंत सादर करावेत. यासाठी सेवासमाप्त झालेल्या कर्मचा-यांनी अर्ज करण्याची आवश्यकता नाही याची आस्थापना विभाग कर्मचा-यांनी नोंद घ्यावी.
10. दि.29 मार्च 2018 रोजी व त्यानंतर सेवा निवृत्त होणा-या महानगरपालिका कर्मचा-यांना वरीलप्रमाणे सुधारित कमाल मर्यादेसापेक्ष उपदानाचे अधिदान सेवानिवृत्तीच्या इतर फायद्यांसोबत करण्यात यावे.

सर्व सहाय्यक आयुक्त, खाते प्रमुख व अधिष्ठाता यांना अशी विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी परिपत्रकातील आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित आस्थापना कर्मचा-यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://45.249.109.226/Circulars/ GAD/ Dy.CA. Estt- II या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

MCGM OFFICIAL GROUPS
MUBEEN KHAN-9029798198
& URDU TEACHERS UNION

सही/-दि.30.08.2019
श्री.अशोक दा.रुपवते
उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)

सही/-दि.31.08.2019
श्रीम.सुलोचना कवडे
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सही/-दि.31.08.2019
श्री.प्रदिप पडवळ
प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.

सही/-दि.03.09.2019
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/-दि.03.09.2019
श्री.ए.एल.ज-हाड
अति.आयुक्त (शहर)

सही/-दि.04.09.2019
श्री. प्रविण दराडे
अति.आयुक्त (प्रकल्प)

सही/-दि.07.09.2019
श्री.प्रवीण परदेशी
मा.महानगरपालिका आयुक्त